**महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा**

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केंद्रीय विश्वविद्यालय)

**जनसंपर्क कार्यालय**

**PUBLIC RELATIONS OFFICE**


## डॉ. संदीप मधुकर सपकाले बार्टी, पुणे की संशोधन परिषद के सदस्य चुने गए




वर्धा, 10 अप्रैल 2024 :महाराष्ट्र राज्य के सामाजिक न्याय एवं विशेष सहाय्य विभाग के अंतर्गत महाराष्ट्र राज्य की अनुसूचित जातियों के विकास, शोध एवं प्रशिक्षण हेतु स्थापित प्रतिष्ठित संस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे द्वारा महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय के सहायक प्रोफेसर डॉ. संदीप मधुकर सपकाले को संस्थान की संशोधन परिषद के सम्मानित सदस्य के रूप में चुना गया है।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्था, पुणे द्वारा राज्य की अनुसूचित जातियों के विषय में सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक और मानवविज्ञानी पहलुओं पर सतत अनुसंधान कार्य किए जाते हैं। भारतीय समाज में मानवतावादी विचारों की क्रांति करनेवाले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, आद्यगुरू लहूजी सालवे तथा क्रांतिअग्रणी मुक्ता सालवे जैसे विचारकों के विचार एवं कार्यों पर ऐतिहासिक अनुसंधान करते हुए जनसामान्य तक उनके सामाजिक विचारों का प्रसार करना संस्थान का प्रमुख उद्देश्य है।

डॉ. संदीप मधुकर सपकाले अनुसूचित जातियों से संबंधित राज्य की नीतियों पर आधारित संस्थान की विविध शोध परियोजनाओं पर मार्गदर्शन के लिए संशोधन परिषद में विषय विशेषज्ञ के रूप में कार्य करेंगे। विगत 20 वर्षों से अकादमिक और सामाजिक-सांस्कृतिक जगत में आंबेडकरी-बौद्ध चिंतक, प्राध्यापक और अनुसंधानकर्ता के रूप में ख्यात एवं साहित्य विद्यापीठ के अंतर्गत मराठी साहित्य विभाग के प्रभारी डॉ. संदीप मधुकर सपकाले को इस उपलब्धि पर विश्वविद्यालय के अध्यापक, अधिकारी एवं विद्यार्थियों ने बधाई दी है।

## डॉ. संदीप मधुकर सपकाळे यांची बार्टी, पुणेच्या संशोधन परिषदेत निवड

वर्धा, 10 एप्रिल 2024: महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींच्या विकास, शोध आणि प्रशिक्षणासाठी स्थापन करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यातर्फे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील सहायक प्राध्यापक डॉ. संदीप मधुकर सपकाळे यांची संस्थेच्या संशोधन परिषदेचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे द्वारा राज्यातील अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि मानववंशशास्त्रीय बाबींवर सातत्याने संशोधन कार्य करण्यात येते. भारतीय समाजात मानवतावादी विचारांची क्रांती करणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, आद्यगुरू लहुजी साळवे आणि क्रांतिकारक मुक्ता साळवे यांच्या सारख्या विचारवंतांचे विचार आणि कार्याचे ऐतिहासिक संशोधन करून त्यांचे सामाजिक विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

डॉ. संदीप मधुकर सपकाळे हे अनुसूचित जातींशी संबंधित राज्याच्या धोरणांवर आधारित संस्थेच्या विविध संशोधन प्रकल्पांवर मार्गदर्शन करण्यासाठी परिषदेत विषयतज्ज्ञ म्हणून काम पाहतील. डॉ. सपकाळे मागील 20 वर्षांपासून शैक्षणिक व सामाजिक-सांस्कृतिक विश्वात आंबेडकरी-बौद्ध विचारवंत, प्राध्यापक व संशोधक म्हणून तसेच साहित्य विद्यापीठांतर्गत मराठी साहित्य विभागाचे प्रभारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे विश्वविद्यालयाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

---


**पोस्ट हिंदी विश्वविद्यालय, गांधी हिल्स, वर्धा-442001 (महाराष्ट्र), भारत**

**ई-मेल/E-mail: mgahvpro@gmail.com, वेबसाइट/Website: www.hindivishwa.org**

**दूरभाष : +91-7152-252651 मोबाइल/Mobile : 9960562305**